






# महाराष्ट्र शासन

# अर्थसंकल्पः २०१४-१५

# उद्योग, उर्जा व कामगार विभाग

**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**
११५- समर्थन, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई स्थानकासमोर,
वसई (पू), ठाणे -४०१ २०८ ✆ ०२५०-२३९०१०३/१०४
Email: samarthanmumbai97@gmail.com website: www.samarthanadvocacy.org

# समर्थन

स्व. सदानंद वर्दे
(संस्थापक, अध्यक्ष)

अध्यक्ष : श्री. चंद्रशेखर प्रभू
उपाध्यक्ष : श्री. टी. के. चौधरी
कार्याध्यक्ष : श्री. विवेक पंडित

- संपादक -

मुक्ता भारती

-विश्लेषक-

गुरुनाथ सावंत (९९६७७२२९०७)
रुपेश कीर (९८९२९३९६१७)

नोंदणी क्रमांक:
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
समर्थन – ११५-धुरी कॉमर्स प्लाझा,
वसई रोड रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), ठाणे – ४०१ २०८

दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

**लोकशाही बळकट करण्याकरिता**
**उपेक्षितांचे 'समर्थन'**

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

**मान. विधिमंडळ सदस्यांसाठी महत्वाचे मुद्दे :-**

## राज्य अर्थसंकल्पात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे स्थान:

- वर्ष २००५-०६ ते २०१२-१३ या कालावधीत विभागाला सरासरी रु. ६ हजार ६३० कोटी २५ लाख इतका निधी उपलब्ध झाला आहे.
- वर्ष २००७-०८ पासून राज्य शासनाने विभागाला कधीही सुधारित अंदाजाइतका निधी उपलब्ध करुन दिलेला नाही.
- राज्याच्या खर्चाच्या तुलनेत वर्ष २००५-०६ ते २०१२-१३ पर्यंत विभागाचा सरासरी प्रत्यक्ष खर्च ५.८७ टक्के
- राज्य अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्चात या विभागाचा वर्ष २०१२-१३ मध्ये ६.२० टक्के इतका हिस्सा असतांनाही वर्ष २०१३-१४ चे सुधारित अंदाज हे केवळ ५.८७ टक्के इतके दिसून येतात यावरून विभागाचा नियोजन शुन्य कारभार दिसून येतो.
- विभागाचा सरासरी योजनांतर्गत खर्चापेक्षा सरासरी योजनेतर खर्च हा रु. ३ हजार ७०६ कोटी ६३ लाखांनी (२५३ टक्के) अधिक.

## औद्योगिक गुतवणूक :

- राज्यात ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर २०१३ या कालावधीत रु. १० लाख २१ हजार ६३३ कोटींची गुंतवणूक झाली होती मात्र आपल्या शेजारचे राज्य गुजरात येथे याच कालावधीत आपल्या राज्याहून अधिक सुमारे १२ लाख ७० हजार १७२ कोटींची गुंतवणूक झालेली दिसते.
- महाराष्ट्र राज्यात एकूण १८ हजार ४०६ औद्योगिक प्रस्ताव आले तर गुजरातमध्ये महाराष्ट्रापेक्षा कमी १२ हजार २३० इतके औद्योगिक प्रस्ताव आले मात्र गुंतवणूक जास्त झाल्याची दिसते.
- महाराष्ट्राची गुजरातशी तुलना करता, राज्याच्या एकूण प्रस्तावापैकी गुजरातमध्ये ६ हजार १७६ प्रस्ताव कमी आलेले असून देखील त्यांची गुंतवणूक ही २ लाख ४८ हजार ५३९ कोटींनी जास्त दिसते.
- वर्ष २००६-०७ शी तुलना करता वर्ष २०१०-११ मध्ये २० प्रकल्पांची भर पडूनही थेट प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक मात्र रु. ९ हजार ९३३ कोटीने कमी झाली होती.

## विशेष आर्थिक क्षेत्र; कोकणात सर्वात जास्त प्रस्तावित गुंतवणूक:

- राज्यातील एकूण १२४ विशेष आर्थिक क्षेत्रांचे प्रस्ताव केंद्र शासनाने मान्य केलेले असून ६४ प्रस्ताव अधिसूचित झालेले आहेत व त्यापैकी केवळ १८ प्रस्ताव कार्यान्वित आहेत.
- मंजूर प्रस्तावांमध्ये एकूण रु. १ लाख ४३ हजार ७८९ कोटींच्या प्रस्तावित गुंतवणुकीपैकी केवळ कोकणातच रु. ८२ हजार ८१४ कोटी (५७.५९ टक्के) गुंतवणूक तर १५ हजार ४३२ हेक्टर जमीन विशेष आर्थिक क्षेत्राखाली.
- एकूण प्रस्तावित गुंतवणुकीपैकी अमरावतीमध्ये सर्वात कमी रु. २ हजार ३६० कोटी (१.६४ टक्के) गुंतवणूक तर औरंगाबाद मध्ये रु. २ हजार ८८२ कोटी (२ टक्के) गुंतवणूक अपेक्षित आहे मात्र औरंगाबाद मध्ये केवळ २ प्रस्ताव कार्यन्वित झालेले असून अमरावती मध्ये एकही प्रस्ताव अजून कार्यन्वित झालेला नाही.

- राज्यात एकूण १८ प्रस्ताव कार्यान्वित झालेले असून त्यामध्ये २ हजार ५२८ हेक्टर क्षेत्र गेले आहे तर ८.६० लाख रोजगार निर्मिती झालेली आहे व त्यासाठी रु. १६ हजार ५२४ कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे.

## लघु उद्योगांना लागलीय अखेरची घरघर !

- वर्ष २०११-१२ मध्ये (फेब्रुवारी २०१२ अखेर) १ हजार ७१४ लघु उद्योग तर १४ मध्यम व मोठे उद्योग बंद पडले व त्यातून अनुक्रमे ९ हजार ५४ व ११ हजार ३६० कामगार बाधित झाले.
- महाराष्ट्र राज्यात दर लाख लोकसंख्येमागे ३१ चालू कारखाने असून त्या कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगार हे १ हजार ३९१ इतके आहेत.
- सन २०१० मध्ये कारखान्यांतील रोजगारामधील महिला कामगारांचा हिस्सा अत्यल्प म्हणजेच केवळ ४ टक्के
- वर्ष २०१२ च्या आकडेवारीनुसार राज्यातील सरासरी दैनिक रोजगारामध्ये ग्राहक वस्तू उद्योगाचा वाटा २८.५० टक्के, पुनर्निर्माण वस्तू उद्योगाचा वाटा ३५.६७ टक्के तर भांडवली वस्तू उद्योगाचा वाटा हा २८.२८ टक्के इतका होता.

## राज्याला पुरेशी वीज देण्यास शासन अपयशी !

- वर्ष २०१३-१४ मध्ये जानेवारी २०१४ पर्यंत राज्याला ९० हजार २३० दशलक्ष युनिट विजेची आवश्यकता असताना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित मार्फत ८८ हजार १४१ दशलक्ष युनिट वीज उपलब्ध करुन देण्यात आली म्हणजेच २ हजार ८९ दशलक्ष युनिट विजेचा तुटवडा होता.
- वर्ष २०१२-१३ या आर्थिक वर्षात १ लाख ८ हजार ४२४ दशलक्ष युनिट इतकी विजेची आवश्यकता असताना १ लाख ४ हजार ५६९ दशलक्ष युनिट इतकी म्हणजेच ३ हजार ८५५ दशलक्ष युनिट विजेची कपात होती.
- राज्यातील नैसर्गिक वायूजन्य उर्जेत वर्ष २०१०-११ च्या तुलनेत वर्ष २०११-१२ मध्ये ८.१ टक्क्यांनी घट तर वर्ष २०१२-१३ मध्ये ४५.३१ टक्क्यांनी घट झालेली आहे.
- वर्ष २००९-१० मध्ये नैसर्गिक वायुजन्य वीज निर्मिती १५,३२२ दशलक्ष युनिटस् होती त्यात वाढ होऊन वर्ष २०१०-११ मध्ये १८,७२९ दशलक्ष युनिटस् एवढी वीज निर्माण करण्यात आली व वर्ष २०११-१२ मध्ये त्यात घट होवून १७,२०७ दशलक्ष युनिट इतकी कमी झाली होती, वर्ष २०१२-१३ मध्ये तर त्यात अजून घट होऊन ती १०,२४२ दशलक्ष युनिट एवढी झाली सध्या डिसेंबर, २०१३ पर्यंत केवळ ४,९५७दशलक्ष युनिटस् वीज निर्माण झाली आहे.
- वर्ष २००५-०६ ते २०१३-१४ या ९ वर्षाच्या काळात विजेचा सरासरी तुटवडा हा १४.६५ टक्के इतका आहे.
- तसेच वर्ष २०१३-१४ मध्ये डिसेंबर पर्यंत १३८७९ मेगावॅट इतकी सरासरी कमाल मागणी ४९२ मेगावॅट विजेच्या भारनियमासह भागविण्यात आली.
- **३१ मार्च २०१२ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राची विजेची स्थापित क्षमता दर लाख लोकसंख्येमागे १७.८४ मेगावॅट असून देशात महाराष्ट्राचा ८ वा क्रमांक लागतो.**

- गुजरात मध्ये दर लाख लोकसंख्येमागे ३१.७७ मेगावॅट विजेची स्थापित क्षमता आहे तर हिमाचल प्रदेश (३७.९१ मेगावॅट), तामिळनाडू (२०.६३ मेगावॅट), कनार्टक (१९.६५ मेगावॅट), हरियाणा (१८.७८ मेगावॅट), पंजाब (१८.७२ मेगावॅट), उत्तराखंड (१८.२३ मेगावॅट), ही राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत.
- राज्यात ग्रामीण विद्युतीकरणाची टक्केवारी वर्ष २००९-१० मध्ये ८८.९० होती ती वर्ष २०१०-११ मध्ये ९९.७७ टक्के व वर्ष २०११-१२ मध्ये ९९.९१ टक्के इतकी वाढली असली तरी ही वाढ कदाचित खालील ग्रामीण विद्युतीकरणाच्या व्याख्येमुळे झालेली दिसते कारण व्याख्येनुसार एका खेड्यातील एकूण कुटुंबांपैकी किमान १० टक्के कुटुंबांना वीज पुरविली की त्या खेड्याला विद्युतीकरण झालेले खेडे म्हणून ओळखले जाते व त्यामुळे महाराष्ट्र वर्ष २००९-१० मध्ये १७ व्या क्रमांकावर होता तो वर्ष २०११-१२ मध्ये १० व्या क्रमांकावर आलेला असावा.
- **महाराष्ट्र राज्य ग्रामीण भागात ९९.९१ टक्के वीज पुरवित असले तरी देशात त्याचा १० वा क्रमांक लागतो.**
- सन १९९९-२००० व २००२-०३ दरम्यान १६,८१५ वीज पंप संचाचे वाटप केले. त्यापैकी ११,८६७ वीज पंप संच मे, २००६ पर्यंत कार्यान्वित झाले नव्हते. ७५८८ प्रकरणी वीज मंडळाने मागणीपत्रास मंजुरी दिली नव्हती व ३९१२ प्रकरणी वीज मंडळाने पूर्ण सोपस्कार होऊनही वीज पुरविली नव्हती. तर ३६७ पंप संच आदिवासी महामंडळाकडे पडून होते.

## महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित वरील कॅगचे ताशेरे

- कंपनीवरील कर्ज वर्ष २००५-०६ मध्ये रु. २ हजार ४१३ कोटी ७४ लाख एवढे होते ते वर्ष २००९-१० पर्यंत रु. १२ हजार ९८७ कोटी ९९ लाख इतके वाढले होते. ही वाढ ४३८ टक्के इतकी होती.

## कंपनीला पुरेशी वीज निर्माण करण्यात अपयश


- वर्ष २००५-०६ ते २००९-१० या कालावधीत २ लाख ७२ हजार ३५५ दशलक्ष विद्युत युनिटस् लक्ष्याच्या तुलनेत कंपनीला फक्त २ लाख ४४ हजार ३०६ दशलक्ष विद्युत युनिटस्‌ची निर्मिती करता आली होती. परिणामस्वरुप त्यामुळे २८ हजार दशलक्ष विद्युत युनिटस् निर्मितीचा तुटवडा झाला होता
- वर्ष २००५-०६ व २००९-१० मध्ये कंपनीतील मनुष्यबळाची कमतरता अनुक्रमे ३ हजार ३३४ व १ हजार १३१ इतकी
- ११ व्या पंचवार्षिक योजनेनुसार अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत विकसीत करण्याचे उद्दिष्ट वर्ष २००८-०९ व २००९-१० मध्ये अनुक्रमे १ हजार ४० मेगावॅट व १ हजार १२३ मेगावॅट एवढे होते. या उद्दिष्टाच्या तुलनेत प्रत्यक्ष उद्दिष्ट प्राप्ती अनुक्रमे २५९ मेगावॅट व २६९ मेगावॅट एवढीच होती. चुकीचे नियोजन व कामकाज प्रगती संनियंत्रण करण्याच्या यंत्रणेचा अभाव ही उद्दिष्टे प्राप्ती न होण्याची महत्त्वाची कारणे होती.

## मुख्य कामगारांचे घटते प्रमाण तर सिमांतीक कामगारांचे वाढते प्रमाण:

- वर्ष १९९१ मध्ये मुख्य कामगार ९१.४ होते त्यात ७.१ ने घट होऊन वर्ष २००१ मध्ये त्यांचे प्रमाण ८४.३ इतके झाले.
- शेतमजूर व मासेमारीतील कामगारांचे प्रमाण ५.६ टक्क्यांनी कमी झाले.
- सीमांतिक मजूरांच्या संख्येत झालेली वाढ ही तुलनेत सर्वाधिक असल्याचे दिसून येईल. १९९१ ते २००१ या कालावधीत सीमांतिक मजूर हे ७.१ टक्के इतक्या जास्त प्रमाणात वाढले.

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभागास
## निधी उपलब्ध करून देण्यास शासन उदासीन!

आलेख क्र. १. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे अर्थसंकल्पीय अंदाज, सुधारित अंदाज व प्रत्यक्ष खर्च




| | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ अर्थसंकल्पीय अंदाज | २१५३. | ३०३३. | ४३८४. | ३७८७. | ३९७३. | ५२३८. | ६४६९. | ८०३३. | १०३८३ | १४६१५ |
| □ सुधारित अंदाज | ४९३०. | ३९६८. | ५१७३. | ५५४९. | ७२२२. | ६८४९. | १०२४१ | १०८३५ | ११५७५ | |
| ■ प्रत्यक्ष खर्च | ५०४८. | ४१५९. | ५०१३. | ४७५८. | ७०१४. | ६८३७. | ९९४८. | १०२६९ | | |

*(स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज भाग- २, टीप:- वर्ष २०१३-१४ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१४-१५ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २००५-०६ ते २०१२-१३ या कालावधीत विभागाला सरासरी रु. ६ हजार ६३० कोटी २५ लाख इतका निधी उपलब्ध झाला आहे.

- वर्ष २०१३-१४ ची अर्थसंकल्पीय तरतूद ही वर्ष २०१२-१३ च्या सुधारित अंदाजापेक्षाही कमी दिसते व सुधारित मध्ये नेहमी प्रमाणे वाढ दर्शविण्यात आलेली आहे.


- विभागाने वर्ष २०१३-१४ मध्ये रु. १० हजार ३८३ कोटी ८० लाखांचे अर्थसंकल्पीय अंदाज केले असले व सुधारित अंदाज रु. ११ हजार ५७५ कोटीचे दिसत असले तरी नेहमीप्रमाणे विभागाला सुधारित अंदाजाइतका निधी प्राप्त होणार नाही हे वरील आलेखावरुन स्पष्ट होते.

- वर्ष २००७-०८ पासून राज्य शासनाने विभागाला कधीही सुधारित अंदाजाइतका निधी उपलब्ध करुन दिलेला नाही.

- वर्ष २००८-०९ पासूनचे विभागाचे अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा सुधारित अंदाज हे २ ते ३ हजार कोटींनी जास्त दिसतात. सातत्याने सुधारित अंदाजामध्ये इतक्या पटीने वाढ केली जाते मात्र त्या पटीने अर्थसंकल्पीय अंदाज कधीही न करणे हे एक **Bad Budgeting** चेच उदाहरण म्हणावे लागेल व यावर राज्य शासनाचा देखील अंकुश नसल्याचे दिसून येते.

# राज्यातील अर्थसंकल्पात
# उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा वाटा ५.८७ टक्के

आलेख क्र. २. राज्य अर्थसंकल्पातील उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे स्थान.




| | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | ६.८१ | ५.३६ | ६.०८ | ४.७२ | ५.९५ | ५.२१ | ६.६६ | ६.२० | ५.८७ | ६.८४ |


*(स्त्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज भाग- २, टीप:- वर्ष २०१३-१४ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१४-१५ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- राज्याच्या खर्चाच्या तुलनेत वर्ष २००५-०६ ते २०१२-१३ पर्यंत विभागाचा सरासरी प्रत्यक्ष खर्च ५.८७ टक्के इतका.
- वर्ष २००५-०६ मध्ये राज्याच्या तुलनेत विभागाचा प्रत्यक्ष खर्च ६.८१ टक्के होता तो पुढे कमी होऊन वर्ष २००६-०७ मध्ये ५.३६ टक्के झाला त्यानंतर सातत्याने त्यात चढ-उतारच दिसून येतो.
- राज्य अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्चात या विभागाचा वर्ष २०१२-१३ मध्ये ६.२० टक्के इतका हिस्सा असतानाही वर्ष २०१३-१४ चे सुधारित अंदाज हे केवळ ५.८७ टक्के इतके दिसून येतात यावरून विभागाचा नियोजन शून्य कारभार दिसून येतो.
- राज्याचा औद्योगिक विकास व उर्जा यांवरील मागील दहा वर्षाचा खर्चाचा आलेख पाहता तो स्थिर दिसून येतो ६.८१ टक्क्यांच्या वर तो कधीच गेला नाही या स्थिरतेमुळे राज्याचा औद्योगिक विकास ढासळत असून राज्यातील उर्जास्त्रोत वाढण्यास मर्यादा येत आहेत व कामगारांच्या विकासाला देखील आळा बसला आहे. आता नव्याने येणाऱ्या शासनाने तरी सदर औद्योगिक विकास, कामगारांचा विकास तसेच उर्जास्त्रोत वाढविणे याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे.

# मागील ९ वर्षात विभागाचा योजनेतर खर्च योजनांतर्गत खर्चापेक्षा सरासरी २५३ टक्क्यांनी अधिक!

आलेख क्र. ३. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा योजनांतर्गत व योजनेतर खर्च.

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा योजनेतर व योजनांतर्गत खर्च**




| | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| योजनांतर्गत खर्च | १३७२ | ११७० | ६९७ | १२९६ | १३७२ | १८३४ | १७७१ | २१८९ | ३११७ | २०७६ |
| योजनेतर खर्च | ३६७६ | २९९० | ४३१६ | ३४६२ | ५६४३ | ५००४ | ८१७४ | ८०८९ | ८४५८ | १२५३९ |

*स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज भाग- २, खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज.*
*टीप:- वर्ष २०१३-१४ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१४-१५ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वरील आलेख उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे योजनेतर व योजनांतर्गत खर्चाचे स्वरूप स्पष्ट करतो.
- वर्ष २००५-०६ ते २०१२-१३ या कालावधीत विभागाचा योजनांतर्गत सरासरी खर्च रु. १ हजार ४६२ कोटी ६२ लाख इतका आहे.
- वर्ष २००५-०६ ते २०१२-१३ या वर्षात विभागाचा सरासरी योजनेतर खर्च रु. ५ हजार १६९ कोटी २५ लाख इतका आहे.
- वर्ष २००५-०६ ते २०१२-१३ या कालावधीत विभागाचा सरासरी योजनांतर्गत खर्चापेक्षा सरासरी योजनेतर खर्च हा रु. ३ हजार ७०६ कोटी ६३ लाखांनी (२५३ टक्के) अधिक आहे.

## औद्योगिक गुंतवणुकीत महाराष्ट्र गुजरातच्या मागे!

तक्ता क्र- १ निवडक राज्यातील मंजूर औद्योगिक प्रस्ताव (ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०१३)

| राज्य | औद्योगिक प्रस्ताव (संख्या) | गुंतवणूक (रु. कोटीत) | गुंतवणुकीची भारताशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १८४०६ | १०,२१,६३३ | ९.७१ |
| गुजरात | १२२३० | १२,७०,१७२ | १२.०७ |
| तामिळनाडू | ९१९१ | ४,९३,३६९ | ४.६९ |
| आंध्र प्रदेश | ८३४१ | ९,०९,७९२ | ८.६५ |
| उत्तर प्रदेश | ७८९२ | ३,०३,२३३ | २.८८ |
| **भारत** | **१,०२,१५७** | **१,०५,२०,२३६** | **१००** |

*(स्त्रोत:- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१३-१४)*

- राज्यात ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर २०१३ या कालावधीत रु. १० लाख २१ हजार ६३३ कोटींची गुंतवणूक झालेली दिसत असली तरी आपल्या शेजारचे राज्य गुजरात येथे याच कालावधीत आपल्या राज्याहून अधिक रु. १२ लाख ७० हजार १७२ कोटींची गुंतवणूक झालेली दिसते.
- महाराष्ट्र राज्यात एकूण १८ हजार ४०६ औद्योगिक प्रस्ताव आले तर गुजरातमध्ये महाराष्ट्रापेक्षा कमी १२ हजार २३० इतके औद्योगिक प्रस्ताव आले मात्र गुंतवणूक जास्त झाल्याची दिसते.
- महाराष्ट्राची गुजरातशी तुलना करता, राज्याच्या एकूण प्रस्तावापैकी गुजरातमध्ये ६ हजार १७६ प्रस्ताव कमी आलेले असून देखील त्यांची गुंतवणूक ही २ लाख ४८ हजार ५३९ कोटींनी जास्त दिसते.
- औद्योगिक प्रस्तावामध्ये प्रथम क्रमांकावर असलेला महाराष्ट्र गुंतवणुकीमध्ये मात्र मागील तीन वर्ष सतत दुसऱ्या क्रमांकावर आहे.

## महाराष्ट्रातील थेट प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीत सातत्याने घट

तक्ता क्र. २ राज्यातील मंजूर थेट प्रत्यक्ष परकीय गुंतवणुक प्रकल्प (एफ. डी. आय.)

| अ. क्र. | कालावधी | थेट प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक प्रकल्प (एफ.डी.आय.) | |
|---|---|---|---|
| | | प्रकल्प संख्या | गुंतवणूक (रु.कोटी) |
| १ | एप्रिल २००६ ते मार्च २००७ | ६४ | १२,९१६ |
| २ | एप्रिल २००७ ते मार्च २००८ | ८४ | ५,५५२ |
| ३ | एप्रिल २००८ ते फेब्रुवारी २००९ | ८८ | ७,४०० |
| ४ | एप्रिल २००९ ते मार्च २०१० | ४२ | १,३०९ |
| ५ | एप्रिल २०१० ते मार्च २०११ | १०४ | २,९८३ |
| ६ | एप्रिल २०११ ते मार्च २०१२ | १०५ | ५,४५४ |

(स्त्रोत: कार्यक्रम अंदाजपत्रक (उद्योग), २०११-१२ ते २०१३-१४)

- राज्यात एप्रिल २००६ ते मार्च २०१२ या कालावधीत सर्वात जास्त थेट प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक वर्ष २००६-०७ मध्ये रु. १२ हजार ९१६ कोटी होती.
- वर्ष २००९-२०१० मध्ये सर्वात कमी रु.१ हजार ३०९ कोटींचीच गुंतवणूक तर प्रकल्पांच्या संख्येतही वर्ष २००८-०९ च्या तुलनेत ४६ ने घट.
- वर्ष २००६-०७ शी तुलना करता वर्ष २००८-०९ मध्ये २४ प्रकल्प वाढले असले तरीही गुंतवणूक मात्र रु. ५ हजार ५१६ कोटींनी कमी दिसून येते.
- वर्ष २००६-०७ शी तुलना करता वर्ष २०१०-११ मध्ये २० प्रकल्पांची भर पडूनही गुंतवणूक मात्र रु. ९ हजार ९३३ कोटीने कमी झाली होती.

# विशेष आर्थिक क्षेत्र

## राज्यातील एकूण १२४ विशेष आर्थिक क्षेत्रांना केंद्राची मान्यता

## कोकणात सर्वाधिक ६० विशेष आर्थिक क्षेत्र मंजूर

केंद्र शासनाच्या विशेष आर्थिक क्षेत्र कायदा, २००५ व विशेष आर्थिक क्षेत्र नियम,२००६ नुसार महाराष्ट्रातील विशेष आर्थिक क्षेत्राबाबतचे कामकाज केले जाते. राज्यातील विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यासाठी डिसेंबर २०१३ पर्यंत एकूण २३६ विशेष आर्थिक क्षेत्राबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. या प्राप्त प्रस्तावांपैकी १२४ प्रस्तावांना केंद्र शासनाकडून मान्यता (१०४ औपचारिकरित्या व २० तत्वत:) देण्यात आली आणि ६५ प्रस्ताव अधिसूचित झाले आहेत.

तक्ता क्र. ३– मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रांमधील प्रस्तावित गुंतवणूक व रोजगार ( डिसेंबर, २०१३ पर्यंत)

| विभाग | विशेष आर्थिक क्षेत्रांची संख्या | | | क्षेत्र (हेक्टर) | | | प्रस्तावित रोजगार (लाखात) | | | प्रस्तावित गुंतवणूक (रु. कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित |
| कोकण | ६० | २८ | ३ | १५४३२ | २४१८ | १९२ | ३५.५६ | ९.४५ | १.३४ | ८२८१४ | ३२८४६ | ३३६१ |
| पुणे | ३७ | २१ | ११ | ५११७ | २६१९ | ४१२ | १०.८१ | ६.१७ | ३.५० | ४२८४३ | ३४९८० | ८७७६ |
| नाशिक | ६ | १ | ० | १४२८ | ११५९ | ० | २.१२ | १.२५ | ० | २८८२ | १३८० | ० |
| औरंगाबाद | ११ | ७ | २ | ३३९६ | ७८६ | २२५ | १.३७ | ०.३१ | ०.१५ | ३६५५ | १७७५ | ६०० |
| अमरावती | २ | २ | ० | १११० | १११० | ० | ०.३५ | ०.३५ | ० | २३६० | २३६० | ० |
| नागपूर | ८ | ६ | २ | ३२०६ | २०९६ | १६९९ | ५.५१ | ३.९७ | ३.६१ | ९२३५ | ४५८८ | ३७८७ |
| **एकूण** | **१२४** | **६५** | **१८** | **२९६८९** | **१०१८८** | **२५२८** | **५५.७२** | **२१.५९** | **८.६०** | **१४३७८९** | **७७९२९** | **१६५२४** |

*(स्त्रोत:- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१३-१४ )*

- राज्यातील एकूण १२४ विशेष आर्थिक क्षेत्रांचे प्रस्ताव केंद्र शासनाने मान्य केलेले असून ६५ प्रस्ताव अधिसूचित झालेले आहेत व त्यापैकी केवळ १८ प्रस्ताव कार्यान्वित आहेत.
- मंजूर प्रस्तावांमध्ये एकूण रु. १ लाख ४३ हजार ७८९ कोटींच्या प्रस्तावित गुंतवणुकीपैकी केवळ कोकणातच रु. ८२ हजार ८१४ कोटी (५७.५९ टक्के) गुंतवणूक तर १५ हजार ४३२ हेक्टर जमीन विशेष आर्थिक क्षेत्राखाली.
- एकूण प्रस्तावित गुंतवणुकीपैकी अमरावतीमध्ये सर्वात कमी रु. २ हजार ३६० कोटी (१.६४ टक्के) गुंतवणूक तर औरंगाबाद मध्ये रु. २ हजार ८८२ कोटी (२ टक्के) गुंतवणूक अपेक्षित आहे मात्र औरंगाबाद मध्ये केवळ २ प्रकल्प कार्यन्वित झालेला असून अमरावती मध्ये एकही प्रस्ताव अजून कार्यन्वित झालेला नाही.
- मंजूर प्रस्तावानुसार एकूण प्रस्तावित गुंतवणूक रु. १ लाख ४३ हजार ७८९ कोटी असून त्यातून प्रस्तावित रोजगार ५५.७२ लाख इतका आहे.
- कोकणानंतर पुण्यामध्ये एकूण ३७ विशेष आर्थिक क्षेत्राचे प्रस्ताव मंजूर केलेले असून त्यातील २१ अधिसूचित करण्यात आलेले आहेत व ११ कार्यान्वित झालेले आहेत. मंजूर प्रस्तावातून रु. ४२ हजार ८४३ कोटींची गुंतवणूक प्रस्तावित आहे.
- राज्यात एकूण १८ प्रस्ताव कार्यान्वित झालेले असून त्यामध्ये २ हजार ५२८ हेक्टर क्षेत्र गेले आहे तर ८.६० लाख रोजगार निर्मिती झालेली आहे व त्यासाठी रु. १६ हजार ५२४ कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे.

## कथा बंद उद्योगांची; व्यथा कामगारांची!

तक्ता क्र. ४ बंद उद्योग व त्यातील बाधित कामगारांची संख्या

| वर्ष | लघु उद्योग | | मध्यम आणि मोठे उद्योग | |
|---|---|---|---|---|
| | बंद उद्योग | बाधित कामगार | बंद उद्योग | बाधित कामगार |
| २००८-०९ | ४२५ | ३,२७२ | ३० | ५,०१५ |
| २००९-१० | २,४१५ | १७,०२४ | १ | १२५ |
| २०१०-११ | ३४० | १,०१२ | ० | ० |
| २०११-१२* | १,७१४ | ९,०५४ | १४ | ११,३६० |
| **एकूण** | **४,८९४** | **३०,३६२** | **४५** | **१६,५००** |

*(स्रोत:- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०११-१२,* * फेब्रुवारी २०१२ अखेर)

- वर्ष २००८-०९ मध्ये लघु उद्योग व मध्यम आणि मोठ्या उद्योगातून अनुक्रमे ३ हजार २७२ आणि ५ हजार १५ कामगार बाधित झाले होते.
- वर्ष २००९-१० मध्ये २ हजार ४१५ लघु उद्योग बंद झाले होते त्यामुळे १७ हजार २४ कामगार बाधित झाले होते.
- वर्ष २०११-१२ मध्ये फेब्रुवारी २०१२ अखेर १ हजार ७१४ लघु उद्योग तर १४ मध्यम व मोठे उद्योग बंद पडले व त्यातून अनुक्रमे ९ हजार ५४ व ११ हजार ३६० कामगार बाधित झाले होते.
- वर्ष २००८-०९ ते २०११-१२ (फेब्रुवारी २०१२ अखेर पर्यंत) या चार वर्षात एकूण ४ हजार ८९४ लघु उद्योग व ४५ मध्यम व मोठे उद्योग बंद पडले त्यामुळे या उद्योगातून अनुक्रमे ३० हजार ३६२ आणि १६ हजार ५०० कामगार असे एकूण ४६ हजार ८६२ कामगार बाधित झाले.
- वरील तक्त्यानुसार लघु उद्योगांचे बंद पडण्याचे प्रमाण जास्त दिसून येते यावरुन शासन लघु उद्योगांप्रती उदासीन असल्याचे स्पष्ट होते.

## सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या पाठपुराव्याबाबत शासन उदासीन!

वीस कलमी कार्यक्रमाअंतर्गत राज्यात नवीन भाग १ व भाग २ एंटरप्रायझेस मेमोरँडम द्यावयाच्या उपक्रमांची लक्षांक दरवर्षी निर्धारित केली जातात मात्र खालील तक्ता पाहता त्या लक्षांकाची पूर्तता करण्यात शासन अपयशी ठरल्याचे दिसते.

तक्ता क्र- ५ सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत प्रगतीची माहिती

| वर्ष | सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | | |
|---|---|---|---|
| | लक्षांक | पूर्तता | पूर्ततेचे लक्षांकाशी प्रमाण |
| २००६-०७ | ९७,१२१ | ३६,५७९ | ३७.६६ |
| २००७-०८ | ९७,५३८ | ३५,३२६ | ३६.२२ |
| २००८-०९ | ४६,४८० | ११,०२१* | २३.७१ |
| २००९-१० | ३,००,००० | ११,८९७* | ३.९६ |
| २०१०-११ | ३,००,००० | १४४९६* | ४.८३ |
| २०११-१२ | -+ | १५६०६* | - |
| २०१२-१३ (सप्टेंबर पर्यंत) | -+ | ८९३४* | - |

+ कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये लक्षांकच देण्यात आलेला नाही. * भाग २ (स्रोत: कार्यक्रम अंदाजपत्रक (उद्योग), २०१३-१४)

- वर्ष २००९-१० मध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना एंटरप्रायझेस मेमोरँडम देण्याचे निर्धारित लक्ष ३ लाख असताना शासनाने भाग २ च्या केवळ ११ हजार ८९७ लक्षाची (३.९६ टक्केच) पूर्तता केली होती.
- तसेच वर्ष २०१०-११ मध्ये देखील शासनाने ३ लाखांचे लक्ष ठेवलेले होते मात्र १४ हजार ४९६ एवढेच साध्य पूर्ण झाले होते ते केवळ ३.२३ टक्के आहे.
- वर्ष २००६-०७ मध्ये निर्धारित लक्षांकापैकी सर्वात जास्त म्हणजेच ३७.६६ टक्के पूर्तता करण्यात आली होती.

- वर्ष २००८-०९ मधील सर्वात कमी ४६ हजार ४८० चा लक्षांकही राज्यास पूर्ण करता आला नाही.
- **शासनाचा लक्षांक जरी वाढता दिसत असला तरी पूर्तता ही कमी कमी होताना दिसत आहे.**
- वर्ष २००६ ते २०१० या कालावधीत सरासरी २१ टक्के उपक्रमांना एंटरप्रायझेस मेमोरँडम देण्यात शासन यशस्वी झाले असले तरी उर्वरित ७९ टक्के उपक्रमांना एंटरप्रायझेस मेमोरँडम देण्यात शासनाला अपयश आले.
- कार्यक्रम अंदाजपत्रक २०१३-१४ मध्ये शासनाने वर्ष २०११-१२ व २०१२-१३ च्या लक्षांकाची माहिती दिलेली नाही.

## पुनर्निर्माण वस्तू उद्योगात सर्वाधिक ३६.७२ टक्के रोजगार

तक्ता क्र. ६ महाराष्ट्र राज्यातील प्रमुख उद्योग गटानुसार कारखान्यातील रोजगार

| उद्योग गट | सरासरी दैनिक रोजगार (संख्या शंभरात) | | | एकूणशी टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१० | २०११ | २०१२* | २०१० | २०११ | २०१२* |
| **ग्राहक वस्तू उद्योग:** | **४,८९४** | **५,१६४** | **५,८६६** | **२९.७०** | **२८.४६** | **२८.५०** |
| खाद्य उत्पादने,पेये व तंबाखूची उत्पादने | १,९२६ | १,९९१ | २,२९४ | ३९.३५ | ३८.५६ | ३९.११ |
| वस्त्रोद्योग (परिधान करण्याची वस्त्रे धरुन) | २,०४५ | २,१८२ | २,४६५ | ४१.७९ | ४२.२५ | ४२.०२ |
| लाकूड आणि लाकडाची उत्पादने | १९७ | २१७ | २१९ | ४.०३ | ४.२० | ३.७३ |
| कागद आणि कागदाची उत्पादने, मुद्रण, प्रकाशन इ. | ६९३ | ७३६ | ८१३ | १४.१६ | १४.२५ | १३.८६ |
| कातडी कमावणे व चामड्याची उत्पादने | ३३ | ३८ | ७५ | ०.६७ | ०.७४ | १.२८ |
| **पुनर्निर्माण वस्तू उद्योग:** | **५,९७७** | **६,६४८** | **७,३४२** | **३६.२७** | **३६.६४** | **३५.६७** |
| रसायने व रासायनिक उत्पादने | १,६६३ | १,८०२ | १,९७४ | २७.८३ | २७.११ | २६.८९ |
| पेट्रोलियम, रबर, प्लास्टिक उत्पादने | ९४९ | १,०८७ | १,१२३ | १५.८८ | १६.३५ | १५.३० |
| अधातू खनिज उत्पादने | ४११ | ४६५ | ५८४ | ६.८८ | ६.९९ | ७.९५ |
| मूलभूत धातू व धातू उत्पादने | २,९५४ | ३,२९४ | ३,६६१ | ४९.४३ | ४९.५५ | ४९.८६ |
| **भांडवली व वस्तू उद्योग:** | **४,२८८** | **५,०३३** | **५,८२१** | **२६.०२** | **२७.७४** | **२८.२८** |
| यंत्रे व यंत्रसामुग्री (परिवहन सामग्री वगळून) | २,०९६ | २,४०७ | २,६३९ | ४८.८८ | ४७.८२ | ४५.३४ |
| परिवहन सामग्री | १,४९२ | १,७८५ | २,१९४ | ३४.७९ | ३५.४७ | ३७.६९ |
| इतर वस्तूनिर्माण उद्योग | ७०० | ८४१ | ९८८ | १६.३२ | १६.७१ | १६.९७ |
| **इतर** | **१,३२०** | **१,३०१** | **१,५५४** | **८.०१** | **७.१७** | **७.५५** |
| **एकूण** | **१६,४७८** | **१८,१४६** | **२०,५८३** | **१००** | **१००** | **१००** |

** २०१२ चे आकडे अस्थायी स्वरुपाचे आहेत.* *(स्त्रोत:- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१३-१४)*

- वर्ष २०१२ च्या आकडेवारीनुसार राज्यातील सरासरी दैनिक रोजगारामध्ये ग्राहक वस्तू उद्योगाचा वाटा २८.५० टक्के, पुनर्निर्माण वस्तू उद्योगाचा वाटा ३५.६७ टक्के तर भांडवली वस्तू उद्योगाचा वाटा हा २८.२८ टक्के इतका होता.
- राज्यात प्रमुख उद्योगगटांमध्ये पुनर्निर्माण वस्तू उद्योगात वर्ष २०१२ मध्ये सर्वात अधिक ३५.६७ टक्के रोजगार.
- वर्ष २०१० शी तुलना करता पुनर्निर्माण वस्तू उद्योगातील रोजगाराच्या प्रमाणात वर्ष २०११ मध्ये ११.२४ टक्के तर वर्ष २०१२ मध्ये २२.८४ टक्क्यांनी वाढ झालेली दिसते.

## दरलाख लोकसंख्येमागे केवळ ३१ कारखाने!

तक्ता क्र.७ कारखानेविषयक सांख्यिकी (अस्थायी) वर्ष २००९

| क्र. | राज्य | दर लाख लोकसंख्येमागे चालू कारखान्यांची संख्या | दर लाख लोकसंख्येमागे कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगार (संख्या) |
|---|---|---|---|
| १. | पंजाब | ६४ | २,१९७ |
| २. | त्रिपूरा | ४६ | १,४४७ |
| ३. | गोवा | ४३ | ३,८२४ |
| ४. | हरियाणा | ४३ | ३,०४३ |
| ५. | आंध्र प्रदेश | ३७ | १,१४४ |
| ६. | महाराष्ट्र | ३१ | १,३९१ |
| | **भारत** | **११** | **५०९** |

स्रोत महाराष्ट्राची आर्थिक पाहणी वर्ष २०१२-१३

- महाराष्ट्र राज्यात दर लाख लोकसंख्येमागे ३१ चालू कारखाने असून त्या कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगार हे १ हजार ३९१ इतके आहेत.
- देशामध्ये दर लाख लोकसंख्येमागे कारखाने उपलब्ध करण्यात पंजाब (६४), त्रिपुरा (४६), गोवा (४३), हरियाणा (४३) व आंध्र प्रदेश (३७) ही राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत.

### कारखान्यातील रोजगार

**कारखाना अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत कारखान्यांना संघटित क्षेत्र असे संबोधले जाते. वर्ष २०११ मध्ये, एकूण ३५ हजार ९४८ कार्यरत असलेल्या कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगार सुमारे १८.५ लाख होता तर मागील वर्षी तो सुमारे १६.५ लाख होता. या कार्यरत कारखान्यांपैकी ५० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांचे प्रमाण २१ टक्के इतके होते.**

**सर्वाधिक कामगार हे मूलभूत धातू व धातू उत्पादनांचे उत्पादन (१८.५ टक्के), तर त्यापाठोपाठ यंत्रे व उपकरणे (परिवहन उपकरणांशिवाय) (१३.२ टक्के) या कारखान्यांमध्ये कार्यरत होते. सन २०१० मध्ये कारखान्यांतील रोजगारामधील महिला कामगारांचा हिस्सा अत्यल्प (४ टक्के) होता.**

**महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१२-१३**

# ऊर्जा

> **वर्ष २०१२ पर्यंत 'सगळ्यांना विद्युत पुरवठा' हे राष्ट्रीय विद्युत धोरणाचे एक उद्दिष्ट होते. महाराष्ट्र हे विजेचा तुटवडा असलेले राज्य असून विजेची कमाल मागणी भागविण्यात ते अपयशी ठरलेले आहे.**
>
> **- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक**

## राज्य अजूनही विजेविना अंधारात!

तक्ता क्र. ८ महाराष्ट्र राज्य विद्युत निर्माण कंपनी कडील माहिती (दशलक्ष युनीटमध्ये)

| वर्ष | विजेची आवश्यकता | उपलब्ध वीज | विजेचा तुटवडा | टुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २००८-०९ | १०४५१९ | ८२६६६ | २१८५३ | २१ % |
| २००९-१० | १०७७८९ | ८८१०० | १९६८९ | १८ % |
| २०१०-११ | ११२००३ | ९३४०४ | १८५९९ | १७ % |
| २०११-१२ | १२४४८२ | १०२५५८ | २१९२४ | १८ % |
| २०१२-१३ | १०८४२४ | १०४५६९ | ३८५५ | ४ % |
| २०१३-१४✷ | ९०२३० | ८८१४१ | २०८९ | २ % |

✷ जानेवारी -२०१४ पर्यंत

स्रोत : माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त माहिती २० फेब्रुवारी, २०१४

- मार्च, २०१४ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात महाराष्ट्र राज्याने १०० टक्के वीज उपलब्ध करुन देण्याची क्षमता निर्माण केली असल्याचे आशादायक आश्वासन दिलेले असले तरी प्रत्यक्षात वस्तुस्थिती मात्र वरील तक्त्यामध्ये आपणास पाहावयास मिळेल.
- वर्ष २०१३-१४ मध्ये जानेवारी २०१४ पर्यंत राज्याला ९० हजार २३० दशलक्ष युनिट विजेची आवश्यकता असताना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. मार्फत ८८ हजार १४१ दशलक्ष युनिट वीज उपलब्ध करुन देण्यात आली म्हणजेच २ हजार ८९ दशलक्ष युनिट विजेचा तुटवडा होता.
- वर्ष २०१२-१३ या आर्थिक वर्षात १ लाख ८ हजार ४२४ दशलक्ष युनिट इतकी विजेची आवश्यकता असताना १ लाख ४ हजार ५६९ दशलक्ष युनिट इतकी म्हणजेच ३ हजार ८५५ दशलक्ष युनिट विजेची कपात होती.
- राज्यात अजूनही ग्रामीण भागात भारनियमन असून मुंबई नजिकच्या उपनगरांनादेखील भारनियमनाचा फटका सोसावा लागत आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील बहुतेक आदिवासी पाडे असे आहेत जेथे अजूनही वीज पोहोचलेली नाही. दर लाख लोकसंख्येस वीज पुरविण्यास महाराष्ट्र ८ व्या क्रमांकावर व ग्रामीण भागात वीज पुरविण्यात महाराष्ट्र १० व्या क्रमांकावर आहे. असे असताना देखील माननीय राज्यपाल आपल्या अभिभाषणात मात्र सांगतात की, महाराष्ट्र राज्याने १०० टक्के वीज उपलब्ध करुन देण्याची क्षमता निर्माण केली आहे.

# राज्याला पुरेशी वीज देण्यास शासन अपयशी!

तक्ता क्र. ९ **महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती क्षमता** (दशलक्ष युनिटस्)

| अ.क्र. | स्त्रोताचा प्रकार | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४*+ | २०१२-१३ मध्ये २०११-१२ च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | औष्णिक | ५४,९७८ | ५२,७९६ | ५९४८२ | ६६०७५ | ५१६०० | ११.१ |
| २. | नैसर्गिक वायूजन्य | १५,३२२ | १८,७२९ | १७२०७ | १०२४२ | ४९५७ | -४०.५ |
| ३. | जलजन्य | ५,६५४ | ६,३७४ | ६८५१ | ५९८० | ४८१४ | -१२.७ |
| ४. | अक्षय ऊर्जा $ | ५,०२६ | ५,११८ | ५९२५ | ५८४२ | ५०२५ | -१.४ |
| ५. | **एकूण राज्यांतर्गत** | **८१,३४५** | **८३,०१७** | **८९४६५** | **८८१३९** | **६६३९६** | **-१.५** |
| ६. | **केंद्रीय क्षेत्रातून उपलब्ध** | **३०,१५६** | **२९,९८२** | **३६७५५** | **३४३८२** | **२४७२९** | **-६.९** |

* डिसेंबर पर्यंत, +अस्थायी , $ बंदिस्त वीजेसह

स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३-१४

- राज्यातील नैसर्गिक वायूजन्य उर्जेत वर्ष २०१०-११ च्या तुलनेत वर्ष २०११-१२ मध्ये ८.१ टक्क्यांनी घट तर वर्ष २०१२-१३ मध्ये तब्बल ४५.३१ टक्क्यांनी घट झालेली वरील तक्त्यावरुन दिसते.
- राज्यातील वर्ष २०११-१२ मधील एकूण वीज निर्मिती (अक्षय ऊर्जेसह) ८९,४६५ दशलक्ष युनिटस् इतकी होती त्यात घट होऊन वर्ष २०१२-१३ मध्ये ८८१३९ दशलक्ष युनिट इतकी झाली होती.
- राज्यातील औष्णिक ऊर्जेतही वर्ष २००९-१० च्या तुलनेत वर्ष २०१०-११ मध्ये ४ टक्क्यांनी घट झालेली होती.
- **वर्ष २००९-१० मध्ये नैसर्गिक वायुजन्य वीज निर्मिती १५,३२२ दशलक्ष युनिटस् होती त्यात वाढ होऊन वर्ष २०१०-११ मध्ये १८,७२९ दशलक्ष युनिटस् एवढी वीज निर्माण करण्यात आली व वर्ष २०११-१२ मध्ये त्यात घट होऊन १७,२०७ दशलक्ष युनिट इतकी कमी झाली होती, वर्ष २०१२-१३ मध्ये तर त्यात अजून घट होऊन ती १०,२४२ दशलक्ष युनिट एवढी झाली सध्या डिसेंबर, २०१३ पर्यंत केवळ ४,९५७ दशलक्ष युनिटस् वीज निर्माण झाली आहे.**
- **वर्ष २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय भाषणात वित्तमंत्र्यांनी नैसर्गिक वायूवरील कर वाढविल्याने सदर वीज निर्मितीवर मर्यादा आल्याचे दिसून येते.**

# मागील ९ वर्षात राज्यात विजेचा तुटवडा सरासरी १५ टक्के!

तक्ता क्र. १०   सरासरी कमाल मागणीच्यावेळी विजेचा पुरवठा व तुट (मेगावॅट मध्ये)

| वर्ष | सरासरी कमाल मागणी + | पुरवठा | तूट | कमाल मागणीशी तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २००५-०६ | १२४०४ | ९२१२ | ३१९२ | २५.७३ |
| २००६-०७ | १२७९७ | ९६३८ | ३१५९ | २४.६८ |
| २००७-०८ | १३१३७ | १०१३० | ३००७ | २२.८८ |
| २००८-०९ | १२५०७ | १०२०३ | २३०४ | १८.४२ |
| २००९-१० | १२६२४ | १०९२१ | १७०३ | १३.४९ |
| २०१०-११ | १३१५७ | ११९१७ | १२४० | ९.४२ |
| २०११-१२ | १४०४३ | १२८४१ | १२०२ | ८.५५ |
| २०१२-१३ | १४०३२ | १३३०९ | ७२३ | ५.१५ |
| २०१३-१४* | १३८७९ | १३३८७ | ४९२ | ३.५४ |

* डिसेंबर पर्यंत     स्त्रोत :- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३-१४

+कृषि भार व्यवस्थापन योजनेद्वारे (सिंगल फेजिंग व फिडर सेपरेशन योजनांसह) कमी झालेला भार (भारमुक्ती/लोड रिलिफ) वगळून.

- वर्ष २००५-०६ ते २०१३-१४ या ९ वर्षाच्या काळात विजेचा सरासरी तुटवडा हा १४.६५ टक्के इतका आहे.
- वर्ष २०११-१२ मध्ये असलेली विजेची १४,०४३ मेगावॅट इतकी सरासरी कमाल मागणी, १,२०२ मेगावॅट इतक्या तुटीचे *(महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने निर्धारित केलेल्या भारनियमाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार)* भारनियमन करुन भागविण्यात आली.
- तसेच वर्ष २०१३-१४ मध्ये डिसेंबर पर्यंत १३८७९ मेगावॅट इतकी सरासरी कमाल मागणी ४९२ मेगावॅट विजेच्या भारनियमासह भागविण्यात आली.

# दर लाख लोकसंख्येला वीज पुरविण्यात महाराष्ट्र ८ व्या क्रमांकावर

तक्ता क्र. ११   ३१ मार्च २०१२ पर्यंत, दर लाख लोकसंख्येमागे विजेची स्थापित क्षमता (मेगावॅट)

| क्र. | राज्य | दर लाख लोकसंख्येमागे विजेची स्थापित क्षमता | क्र. | राज्य | दर लाख लोकसंख्येमागे विजेची स्थापित क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| १. | हिमाचल प्रदेश | ३७.९१ | ५. | हरियाणा | १८.७८ |
| २. | गुजरात | ३१.७७ | ६. | पंजाब | १८.७२ |
| ३. | तामिळनाडू | २०.६३ | ७. | उत्तराखंड | १८.२३ |
| ४. | कर्नाटक | १९.६५ | ८. | महाराष्ट्र | १७.८४ |
| | | | | **भारत** | **१६.५५** |

स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३-१४

- ३१ मार्च २०१२ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राची विजेची स्थापित क्षमता दर लाख लोकसंख्येमागे १७.८४ मेगावॅट असून देशात महाराष्ट्राचा ८ वा क्रमांक लागतो.
- गुजरात मध्ये दर लाख लोकसंख्येमागे ३१.७७ मेगावॅट विजेची स्थापित क्षमता आहे तर हिमाचल प्रदेश (३७.९१ मेगावॅट), तामिळनाडू (२०.६३ मेगावॅट), कनार्टक (१९.६५ मेगावॅट), हरियाणा (१८.७८ मेगावॅट), पंजाब (१८.७२ मेगावॅट), उत्तराखंड (१८.२३ मेगावॅट), ही राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत.

## ग्रामीण भागात वीज पुरविण्यात महाराष्ट्र १० व्या क्रमांकावर!

तक्ता क्र. १२ (वर्ष २०११-१२)

| क्र. | राज्य | ग्रामीण विद्युतीकरणाची टक्केवारी | क्र. | राज्य | ग्रामीण विद्युतीकरणाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | आंध्र प्रदेश | १०० | ६. | पंजाब | १०० |
| २. | दिल्ली | १०० | ७. | तामिळनाडू | १०० |
| ३. | गोवा | १०० | ८. | सिक्किम | १०० |
| ४. | हरियाणा | १०० | ९. | कर्नाटक | ९९.९५ |
| ५. | केरळ | १०० | १०. | महाराष्ट्र | ९९.९१ |
| | | | | **भारत** | **९३.७५** |

स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३-१४

- **राज्यात ग्रामीण विद्युतीकरणाची टक्केवारी वर्ष २००९-१० मध्ये ८८.९० होती ती वर्ष २०१०-११ मध्ये ९९.७७ टक्के व वर्ष २०११-१२ मध्ये ९९.९१ टक्के इतकी वाढली असली तरी ही वाढ कदाचित खालील ग्रामीण विद्युतीकरणाच्या व्याख्येमुळे झालेली दिसते कारण व्याख्येनुसार एका खेड्यातील एकूण कुटुंबांपैकी किमान १० टक्के कुटुंबांना वीज पुरविली की त्या खेड्याला विद्युतीकरण झालेले खेडे म्हणून ओळखले जाते व बहुतेक याच कारणाने महाराष्ट्र वर्ष २००९-१० मध्ये १७ व्या क्रमांकावर होता तो वर्ष २०११-१२ मध्ये १० व्या क्रमांकावर आलेला असावा.**
- महाराष्ट्र राज्य ग्रामीण भागात ९९.९१ टक्के वीज पुरवित असले तरी देशात त्याचा १० वा क्रमांक लागतो.
- देशाची ग्रामीण विद्युतीकरणाची टक्केवारी ९३.७५ टक्के असून देशातील ८ राज्यांची ग्रामीण विद्युतीकरणाची टक्केवारी १०० टक्के आहे.

### ग्रामीण विद्युतीकरणाची व्याख्या:

**व्याख्या सूची :-**

**ग्रामीण विद्युतीकरण (विद्युतीकरण केलेले खेडे)** :- ग्रामपंचायतीने (१) लोकवस्ती असलेले खेडे, तसेच जेथे किमान एक दलित वस्ती/वाडी असेल तेथे वितरण रोहित्र आणि वितरण तारमार्ग यांसारख्या पायाभूत सोयी केलेल्या असतील, आणि (२) शाळा पंचायत कार्यालय, आरोग्य केंद्रे, दवाखाने, समाज मंदिर यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी वीज पुरवलेली असेल, आणि (३) वीज पुरवठा केलेल्या कुटुंबांची संख्या, त्या खेड्यातील कुटुंबांच्या एकूण संख्येपैकी किमान १० टक्के एवढी असेल या मुद्यांवर दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे खेड्यांचे, विद्युतीकरण केलेले खेडे म्हणून वर्गीकरण करण्यात येईल.

स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०११-१२

# राज्यातील आदिवासी विजेविना अंधारात!

## अनुसूचित जमाती व कल्याण समितीच्या अहवालातील महत्त्वाचे मुद्दे

**अनुसूचित जमाती उपभोक्तांसाठी कृषी वीज पंप जोडणी योजना :**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागातर्फे १०० टक्के अनुदानित (सबसीडी) योजनेंतर्गत असलेल्या अनुसूचित जमातीच्या उपभोक्तांसाठी सेवा जोडणी आकार घेतला जात नाही. तसेच कृषी वीज पंप हे शासनातर्फे अनुदान स्वरुपात देण्यात येत असतात. त्यांना शेतीसाठी वीज पुरवठा देताना प्राधान्य देण्यात येते. मागील तीन वर्षात कृषी वीज पंप जोडण्या दिलेल्या उपभोक्तांची संख्या खालीलप्रमाणे आहे :-

तक्ता क्र. १३

| वर्ष | वीज जोडणीसाठी अनुसूचित जमातीचे प्रलंबित अर्ज संख्या | अनुसूचित जमातीच्या अर्जदारांना एकूण दिलेली वीज जोडणी | अनुसूचित जमातीच्या अर्जदारांची वर्षअखेर प्रलंबित वीज जोडणी |
|---|---|---|---|
| २००६-०७ | १०५९ | २६८ | ७९१ |
| २००७-०८ | ७९१ | १०० | ६९१ |
| २००८-०९ | ६९१ | २२९ | ४६२ |
| **एकूण** | | **५९७** | |

स्त्रोत: अनुसूचित जमाती कल्याण समिती अहवाल क्र. ४ (वर्ष २०१०-११)

समितीने अनुसूचित जमातीच्या लोकांच्या कल्याणासाठी जिल्ह्यातील आदिवासी पाडे, वस्त्या वगैरे या ठिकाणी कोणत्या योजना राबविल्या आहेत अशी पृच्छा केली असता अधिक्षक अभियंता यांनी यवतमाळ जिल्ह्यात १८६९ गावे आहेत. त्यातील ५६७ गावे ही आदिवासी उपयोजनेत समाविष्ट करण्यात आलेली आहेत त्यापैकी ५९४ गावांचे विद्युतीकरण करण्यात आलेले असून **६३ गावांचे विद्युतीकरण व्हावयाचे आहे**. **म्हणजेच गावातील १० टक्के घरांमध्ये वीज गेलेली असेल तर त्या गावाचे विद्युतीकरण झालेले आहे असे मानले जाते अशी समितीला माहिती दिली**.

गावांचे विद्युतीकरण करण्यात आलेले आहे म्हणजे आपण नेमके काय केले आहे, गावापर्यंत वीज दिलेली आहे की, गावातील आदिवासींच्या घरामध्ये प्रत्यक्ष वीज दिलेली आहे अशी समितीने विचारणा केली असता मुख्य अभियंता यांनी जिल्ह्यात एकूण **२३७ आदिवासी पाडे असून त्यापैकी ३० पाड्यांचे विद्युतीकरण व्हायचे आहे**. विद्युतीकरण बाकी असलेल्या गावांचा आणि पाड्यांचा समावेश राजीव गांधी विद्युतीकरण योजनेंतर्गत करण्यात आला आहे. **राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेतून यवतमाळ जिल्ह्यासाठी २५.१७ कोटी रुपये मंजूर झालेले आहेत आणि त्यातून एकूण २६२ गावांचे विद्युतीकरण करण्याचे काम प्रस्तावित केलेले आहे,** असे समितीला सांगितले. समितीने ज्या ज्या ठिकाणी वीज कनेक्शनची सोय अजून झालेली नाही आणि ज्यांना वीज द्यायची आहे त्या त्या ठिकाणी पत्रके काढून ग्रामसेवकांमार्फत आदिवासींची नावे घेण्यात यावी जेणे करुन ही योजना चांगल्याप्रकारे राबविली जाईल अशी शिफारस केली.

## ग्रामीण विद्युतीकरणाबाबत अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या शिफारशी-

- आदिवासी गावातील शेतकऱ्यांना पाण्याची सोय व्हावी या हेतूने शेती पंपाला वीज देताना आदिवासी जमातीच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. वीज पुरवठा करतांना ४ विद्युत पोल देण्याचे जे निकष आहेत त्यात शिथिलता आणणे गरजेचे आहे. अशा निकषांमुळे आदिवासींना वीज कनेक्शन मिळण्यास अडचण होते. शेती पंपासाठी विद्युत पुरवठा करण्यात येत असून सन २००५-०६ ते सन २००९-१० या कालावधीत **एकूण ८७७ लाभार्थ्यांना शेती विद्युत पुरवठा करण्यात आला असल्याचे आकडेवारीवरुन दिसून येते परंतु आजपर्यंत ६२३ पात्र आदिवासी लाभार्थ्यांना शेतीसाठी वीज पुरवठा करण्यात आला आहे असे निदर्शनास आलेले असल्याने** उर्वरित २५१ आदिवासी लाभार्थ्यांना शेतीसाठी वीज पुरवठा करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.
- समितीने महावितरण कंपनीला भेट दिल्यानंतर, आदिवासींना वीज कनेक्शन आणि मोटार पंपासाठी १००% अनुदानाची योजना प्रभावीपणे कार्यान्वित होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागाने विद्युत महावितरण कंपनीकडे निधी वर्ग केल्यास महावितरण कंपनीकडून तातडीने मोटारपंप खरेदी करण्यात येतील. विजेचे कनेक्शन्स आणि मोटार पंप महावितरण कंपनीकडून बसवून घेतल्यास आदिवासी शेतकऱ्यांना त्याचा लाभ त्वरित मिळू शकेल. आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंप देण्याची ही एक चांगली योजना असल्याने महावितरण कंपनीला विद्युत पंप बसविण्याचे काम दिले तर ही योजना अतिशय चांगल्याप्रकारे अमंलात येऊ शकेल.

  यवतमाळ जिल्ह्यात ६५७ गावांमध्ये ३८७ प्रकरणे या योजनेमुळे प्रलंबित आहेत. प्रकल्प अधिकारी पांढरकवडा क्षेत्राअंतर्गत सन १९९१ च्या जनगणनेनुसार ८७ हजार आदिवासींची लोकसंख्या होती व सन २००१च्या जनगणनेनुसार ४ लक्ष ७३ हजार एवढी आदिवासींची लोकसंख्या आहे. **या प्रकल्पांतर्गत सन २००२ पासून मोटार पंप वीज कनेक्शन अभावी बंद पडून आहेत.** आदिवासी विकास विभागाने आदिवासींना मोटार पंप दिले परंतु विद्युत वितरण कंपनीने विहित मुदतीत वीज कनेक्शन दिलेले नसल्याने विजेची मागणी वाढली. वीज कनेक्शनचे टारगेट वाढवून ज्या लाभार्थ्यांना मोटार पंप दिले आहे अशा लाभार्थ्यांचे वीज कनेक्शन जोडणीचे काम पूर्ण करण्याच्या सूचना विद्युत वितरण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने देण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.
- त्र्यंबक तालुक्यातील (जि.नाशिक)हरसुल या गावाअंतर्गत ७२ खेड्यांमध्ये महावितरण कंपनीच्या अभियंता यांना त्या ठिकाणी जाणे शक्य होत नसल्याने तेथील आदिवासी लोकांना अद्यापपर्यंत (२०१०-११) वीज पुरवठा देण्यात आलेला नाही त्यामुळे आदिवासी लोकांचा विकास होऊ शकत नाही.
- नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा, धडगाव या भागात परिस्थिती अतिशय गंभीर आहे. आदिवासी विकास विभागाच्या फंडातून सब स्टेशन बांधली आहेत. परंतु, १८० ॲम्पिअर वीज कॅपॅसिटी असताना त्याचा योग्य वापर केला जात नाही, आदिवासीना इलेक्ट्रिक कनेक्शन देण्यात आलेले नाहीत. सदर ठिकाणी सब स्टेशन्स बांधली आहेत. आदिवासींना वीज कनेक्शन देणे अत्यंत आवश्यक आहे. आदिवासींना वीज कनेक्शन दिले तर फार मोठ्या प्रमाणात आदिवासीचे प्रश्न सुटू शकतील.

स्त्रोत: अनुसूचित जमाती कल्याण समिती अहवाल क्र. ४ व ६ (वर्ष २०१०-११)

## ग्रामीण विद्युतीकरणाबाबत लोकलेखा समितीच्या शिफारशी :

- शासनाने सन १९७३ मध्ये आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप संच पुरविण्याची योजना सुरू केली. हे वीज पंप संच बसविण्याची व त्यासाठी वीज पुरवठा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे पुरविण्याची जबाबदारी आदिवासी विकास महामंडळावर सोपविण्यात आली होती. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी यांनी याबाबतचे सर्व सोपस्कार पूर्ण झाल्याची खात्री करून घ्यावयाची होती. समितीपुढे आलेल्या माहितीवरून असे दिसून आले की, **सन १९९९-२००० व २००२-०३ दरम्यान १६,८१५ वीज पंप संचाचे वाटप केले. त्यापैकी ११,८६७ वीज पंप संच मे, २००६ पर्यंत कार्यान्वित झाले नव्हते. ७५८८ प्रकरणी वीज मंडळाने मागणीपत्रास मंजुरी दिली नव्हती व ३९१२ प्रकरणी वीज मंडळाने पूर्ण सोपस्कार होऊनही वीज पुरविली नव्हती. तर ३६७ पंप संच आदिवासी महामंडळाकडे पडून होते.**
- आदिवासी हा घटक समाजातील कमकुवत घटकांपैकी आहे. आदिवासी क्षेत्राचा तसेच या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासींचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. आदिवासी विकासाच्या विविध योजना राज्य व केंद्र शासनाकडून राबविण्यात येतात. या योजनांपैकी आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप/ तेल पंप पुरविणे ही एक योजना होय. सन १९७३-७४ पासून ही योजना शासनाकडून राबविण्यात येत असून **३ दशके उलटून गेली तरी अद्यापपर्यंत सर्व आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप पुरविण्यात शासनास यश आलेले नाही.** समितीसमोर आलेल्या माहितीमध्ये सन १९९९ ते २०११ पर्यंत एकूण १० ते ११ वर्षांपासून आदिवासी व शेतकऱ्यांच्या विजेच्या जोडण्यांना प्राधान्य आणि डी.पी. डी.सी. अंतर्गत सवलतीची तरतूद असताना **आदिवासी शेतकऱ्यांनी शेतीपंप विकत घेतल्यानंतरही चार ते पाच वर्षे विद्युत जोडण्या दिल्या जात नाहीत. ही अतिशय खेदजनक बाब आहे** अशाप्रकारे आदिवासींना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवून त्यांचा विकास खुंटत आहे. याबाबत समितीने तीव्र शब्दात नापसंती व्यक्त केली. **तरी आदिवासी शेतकऱ्यांच्या वीज पंपाच्या विद्युत जोडणीची सर्व कामे तात्काळ पूर्ण करण्यात यावीत व त्याबाबतचा सविस्तर अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**
- **महावितरणाचे कार्यकारी अभियंता ते वायरमन पर्यंत कोणतेही अधिकारी व कर्मचारी तालुका किंवा ग्रामपातळीवर त्यांच्या कामाच्या ठिकाणी उपस्थित किंवा सेवेस हजर नसतात. त्यांची नेमणूक ग्रामीण पातळीवर असतानाही त्यांचा मुक्काम शहरी भागातच असतो.** मीटर बंद असणे, विजेच्या तारा तुटलेल्या असणे या सर्व समस्यांकडे व त्या निवारण्याचा दृष्टिकोनातून गांभिर्याने लक्ष घालत नाहीत. नागरिक व शेतकरी यांच्या तक्रारीकडे स्थानिक अधिकारी लक्ष देत नसल्याच्या अनेक तक्रारी महावितरणाकडे येत असतात. ज्या ठिकाणी नागरिकांच्या अनेक तक्रारी व समस्या आहे त्या तातडीने दूर करण्यासाठी विशेष लक्ष देऊन त्यांचे योग्य निवारण करण्याकरिता आवश्यक त्या सूचना सर्व संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना देण्यात याव्यात. तसेच अशा ठिकाणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अचानक भेटी देऊन त्यांचे कर्मचारी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी कार्यरत असून त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींची दखल घेतात किंवा नाही याबाबत नियमित माहिती घ्यावी. अशा **अचानक दिलेल्या भेटीमध्ये संबंधित क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी आढळून न आल्यास तसेच त्यांच्याकडे ठेवण्यात आलेल्या तक्रार नोंदवहीत तक्रारी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

*(स्रोत: लोकलेखा समिती वर्ष २०१०-११ अहवाल क्र. आठ)*

# महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित

**'भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक' यांच्या महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी बाबत महत्त्वाच्या नोंदी.**

## भारनियमन मुक्त करणाऱ्या कंपनीवरच कर्जाचा भार!

तक्ता क्र. १४ **महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी वरील कर्ज** (रु. कोटीत )

| वर्ष | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|---|---|
| **कर्ज** | | | | | |
| सुरक्षित | २,०९७.७४ | ३,१३४.०९ | ५,०२८.१५ | ८,५३८.८१ | ९,३१०.४६ |
| असुरिक्षत | ३१६.०० | २८४.४० | २५३.०५ | २२१.४३ | ३६७७.५३ |
| **एकूण** | **२,४१३.७४** | **३,४१८.४९** | **५,२८१.२०** | **८,७६०.२४** | **१२,९८७.९९** |

स्त्रोत :- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा वाणिज्यिक अहवाल क्र. ४ वर्ष २०१०

- कंपनीवरील कर्ज वर्ष २००५-०६ मध्ये रु. २ हजार ४१३ कोटी ७४ लाख एवढे होते ते वर्ष २००९-१० पर्यंत रु. १२ हजार ९८७ कोटी ९९ लाख इतके वाढले होते. ही वाढ ४३८ टक्के इतकी होती.
- कंपनीच्या कर्जामध्ये झालेली वाढ मुख्यत्वे करुन ८० टक्के कर्ज निधीद्वारा राबविण्यात येणाऱ्या नवीन विद्युत प्रकल्पामुळे झाली होती.
- राज्याला भारनियमन मुक्त करण्यासाठी शासन या कंपनीवर अवलंबून असताना एकीकडे कंपनी मात्र कर्जाच्या ओझ्याखाली दबलेली आहे. प्रथम तिला कर्जमुक्त करणे गरजेचे आहे.

## राज्याला पुरेशी वीज पुरविण्यात कंपनीला अपयश!

तक्ता क्र. १५ (दशलक्ष युनिट)

| वर्ष | विजेची आवश्यकता | उपलब्ध करण्यात आलेली वीज | तुटवडा | आवश्यकतेच्या प्रमाणात तुटवड्याची % |
|---|---|---|---|---|
| २००५-०६ | १,७७,४२५ | १,४०,५८९ | ३६,८३६ | २०.७६ |
| २००८-०९ | १,८०,४३० | १,३७,१४६ | ४३,२८४ | २३.९९ |

स्त्रोत :- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा वाणिज्यिक अहवाल क्र. ४ वर्ष २०१०

- वर्ष२००५-०६ या वर्षामध्ये महाराष्ट्राची विजेची आवश्यकता १,७७,४२५ दशलक्ष युनिट निर्धारित करण्यात आली होती. त्यापैकी फक्त १,४०,५८९ दशलक्ष युनिटस् वीज उपलब्ध करून देण्यात आली व ३६,८३६ दशलक्ष युनिटस् विजेचा तुटवडा होता जो आवश्यकतेच्या २०.७६ टक्के एवढा होता.
- वर्ष २००८-०९ या वर्षामधील विजेची आवश्यकता १,८०,४३० दशलक्ष युनिटस् होती मात्र १,३७,१४६ दशलक्ष युनिटस् वीज उपलब्ध करण्यात आली त्यामुळे ४३,२८४ दशलक्ष युनिटस् विजेचा तुटवडा होता तो आवश्यकतेच्या २३.९९ टक्के एवढा होता.

## कंपनीचे अपुरे मनुष्यबळ व्यवस्थापन

पूर्वाश्रमीच्या 'महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ' (एमएसईबी) गुंडाळल्यानंतर व मे २००५ मध्ये 'महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित' ही कंपनी अस्तित्वात आल्याच्या परिणामस्वरुप राज्य शासनाने विद्युत केंद्रामध्ये उपलब्ध असलेले मनुष्यबळ हेच 'मंजूर मनुष्यबळ' धरले होते. मंजूर मनुष्यबळ व 'केंद्रीय विद्युत प्राधिकरण' (सी.ई.ए.) यांच्या निकषानुसार मनुष्यबळाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे होता.

तक्ता क्र .१६ **मनुष्यबळ व्यवस्थापन**

| अक्र | तपशील | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर मनुष्यबळ | १७,४३६ | १४,६५५ | १५,१९० | १५,२३७ | १६,७७३ |
| २ | कंपनीची सीईए निकषानुसार मनुष्यबळाची आवश्यकता | १४,४४१ | १४,९२७ | १८,७८७ | १९,६६७ | २०,७८७ |
| ३ | लेखापरीक्षणाने सीईए निकषानुसार काढलेली मनुष्यबळाची आवश्यकता | १७,०१३ | १७,००४ | १६,०६२ | १६,०६२ | १६,२६३ |
| ४ | प्रत्यक्ष मनुष्यबळ | १४,१०२ | १४,०१० | १४,७३५ | १४,७८० | १५,६४२ |
| **५** | **मंजूर व प्रत्यक्ष यांतील कमतरता** | **३,३३४** | **६४५** | **४५५** | **४५७** | **१,१३१** |
| ६ | पगारावरील खर्च (रु. कोटीत) | ३५३.१८ | ४३४.२८ | ४८७.८० | ६६८.०२ | ६१६.४१ |

स्त्रोत :- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा वाणिज्यिक अहवाल क्र. ४ वर्ष २०१०

- वरील तक्त्यावरून दिसून येते की, वर्ष २००५-०६ ते २००९-१० या कालावधीमध्ये प्रत्यक्ष मनुष्यबळ हे मंजूर केलेल्या मनुष्यबळापेक्षा व केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या निकषानुसार कमीच होते.
- वर्ष २००५-०६ व २००९-१० मध्ये मनुष्यबळाची कमतरता सर्वात जास्त म्हणजेच अनुक्रमे ३ हजार ३३४ व १ हजार १३१ इतकी होती.
- मनुष्यबळाच्या आवश्यकतेबाबतचे भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या लेखापरिक्षणाने काढलेले *'केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे निकष'* व कंपनीचे *'केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे निकष'* यात नेहमीच तफावत दिसून येते.

## कंपनीची उत्पादन अकार्यक्षमता

वर्ष २००५-०६ पर्यंत वार्षिक विद्युत निर्मितीचे लक्ष्य 'केंद्रीय विद्युत प्राधिकरणा' मार्फत (सी.इ.ए.) निश्चित करण्यात येत होते मात्र नंतरच्या कालावधीत ते लक्ष 'महाराष्ट्र विद्युत नियमन आयोग'द्वारा (एम.इ.आर.सी.) निश्चित करण्यात येते. वर्ष २००५-०६ ते २००९-१० या कालावधीत २ लाख ७२ हजार ३५५ दशलक्ष विद्युत युनिटस् लक्ष्याच्या तुलनेत कंपनीला फक्त २ लाख ४४ हजार ३०६ दशलक्ष विद्युत युनिटस्ची निर्मिती करता आली होती. परिणामस्वरुप त्यामुळे २८ हजार दशलक्ष युनिटस् निर्मितीचा तुटवडा झाला होता तो खालील तक्त्यात दर्शविला आहे.

तक्ता क्र. १७ **निर्मितीमधील तुटवडा** (दशलक्ष युनिटस्मध्ये)

| वर्ष | लक्ष्य | प्रत्यक्ष | तुटवडा |
|---|---|---|---|
| २००५-०६ | ४९,५९६ | ४०,३८२ | ९,२१४ |
| २००६-०७ | ५३,८२१ | ५०,३५७ | ३,४६४ |
| २००७-०८ | ५५,७२३ | ५२,२९४ | ३,४२९ |
| २००८-०९ | ५५,६५८ | ५०,३९८ | ५,२६० |
| २००९-१० | ५७,५५७ | ५०,८७५ | ६,६८२ |
| **एकूण** | **२,७२,३५५** | **२,४४,३०६** | **२८,०४९** |

स्त्रोत :- भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा वाणिज्यिक अहवाल क्र. ४ वर्ष २०१०

- वरील तक्त्यानुसार वर्ष २००५-०६ चा अपवाद वगळता वर्ष २००६ ते १० या कालावधीत कंपनी महाराष्ट्र विद्युत नियमन आयोगाने निश्चित केलेले लक्ष साध्य करु शकली नव्हती.

- विद्युत निर्मितीमधील तुटीचा कल वर्ष २००७-०८ नंतर वाढता दिसतो.
- वर्ष २००६ ते १० या कालावधीत झालेला एकूण तुटवडा २८ हजार ४९ इतका होता
- वर्ष २००५-०६ मध्ये व वर्ष २००९-१० मध्ये जेथे कंपनीतील मनुष्यबळाची कमतरता जास्त होती तेथेच विद्युत निर्मितीमधील तुटवडा जास्त म्हणजेच अनुक्रमे ९ हजार २१४ व ६ हजार ६८२ इतका होता.

## अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत

महाराष्ट्र शासनाने राज्यामधील ऊर्जा साठवणूक शक्य व्हावी म्हणून अपारंपरिक ऊर्जा विकास हाती घेण्यासाठी १९८६ मध्ये महाराष्ट्र ऊर्जा विकास एजन्सी (मेढा) संस्थापित केली होती. महाराष्ट्र शासनाने राज्यातील पारंपरिक ऊर्जा निर्मितीच्या १० टक्के वीज अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत (म्हणजे वारा, लहान जल विद्युत प्रकल्प, बायोमास, बायोगॅसेस सहनिर्मिती, नगरपालिका घन कचरा व औद्योगिक कचरा इत्यादी मार्फत) करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले होते.

तक्ता क्र.१८ **अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत** (मेगावॅटमध्ये)

| अ. क्र. | स्त्रोत | राज्यामधील एकूण संभाव्यता | ३१ मार्च २००५ पर्यंत साध्य केलेली | २००५-१० मध्ये साध्य केलेली | मार्च २०१० एकूण संचित साध्य केलेली | शिल्लक संभाव्यता |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वारा | ४,५८४ | ४५६ | १,६१५ | २,०७१ | २,५१३ |
| २. | बायोगॅस निर्मिती | १,२५० | ९१ | २७६ | ३६७ | ८८३ |
| ३. | बायोमास | ७८१ | निरंक | १०७ | १०७ | ६७४ |
| ४. | लहान जल विद्युत प्रकल्प | ६०० | २११ | ८ | २१९ | ३८१ |
| ५. | औद्योगिक कचरा | ३५० | ६ | ५ | ११ | ३३९ |
| ६. | नागरी घन कचरा | २८७ | निरंक | निरंक | निरंक | २८७ |
| | **एकूण** | **७,८५२** | **७६४** | **२,०११** | **२,७७५** | **५,०७७** |

स्त्रोत :- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा वाणिज्यिक अहवाल क्र. ४ वर्ष २०१०

- वरील तक्त्यावरून असे दिसून येते की राज्य शासन एकूण अपारंपरिक ऊर्जा स्त्रोताच्या ७ हजार ८५२ मेगावॅट संभाव्य क्षमतेपैकी २ हजार ७७५ मेगावॅट स्थापित क्षमता वीज उत्पादनांसाठी विकसीत करु शकली होती.
- उर्वरित ५ हजार ७७ मेगावॅट (६४.६६ टक्के ) संभाव्य क्षमता विकसित करण्यात अपयशी ठरले होते.
- बायोमास या स्त्रोताची संभाव्य क्षमता ७८१ मेगावॅट असताना शासनाचे ३१ मार्च २००५ पर्यंतचे साध्य निरंक होते तर नागरी घन कचरा या स्त्रोताची संभाव्य क्षमता २८७ मेगावॅट असून मार्च २०१० पर्यंत शासनाचे साध्य निरंकच.

**११ व्या पंचवार्षिक योजनेनुसार अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत विकसित करण्याचे उद्दिष्ट वर्ष २००८-०९ व २००९-१० मध्ये अनुक्रमे १ हजार ४० मेगावॅट व १ हजार १२३ मेगावॅट एवढे होते. या उद्दिष्टाच्या तुलनेत प्रत्यक्ष उद्दिष्ट प्राप्ती अनुक्रमे २५९ मेगावॅट व २६९ मेगावॅट एवढीच होती.**

*चुकीचे नियोजन व कामकाज प्रगती संनियंत्रण करण्याच्या यंत्रणेचा अभाव ही उद्दिष्टे प्राप्ती न होण्याची महत्त्वाची कारणे होती.*

स्त्रोत :- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा वाणिज्यिक अहवाल क्र. ४ वर्ष २०१०

# कामगार

## सीमांतिक मजूरांच्या प्रमाणात सर्वात जास्त (७.१ टक्के) वाढ!

तक्ता क्र. १९ वर्ष १९९१ व २००१ च्या जनगणनेनुसार कामगारांचे वर्गीकरण

| अ.क्र. | कामगार | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|
| **अ.)** | **कृषि व संलग्न कार्ये** | | |
| १. | शेतकरी | ३०.० | २४.८ |
| २. | शेतमजूर व मासेमारी | २५.९ | २०.३ |
| **ब.)** | **बिगर कृषि कार्ये** | | |
| १. | खाणकाम व दगडखाण काम | ०.३ | ०.४ |
| २. | वस्तुनिर्माण (घरगुती व इतर) | १२.१ | ११.० |
| ३. | बांधकाम | २.४ | ३.४ |
| ४. | व्यापार | ७.८ | ७.१ |
| ५. | वाहतुक, साठवण व दळणवळण | ३.४ | ४.३ |
| ६. | इतर | ९.५ | १३.० |
| | **मुख्य कामगार (अ + ब)** | **९१.४** | **८४.३** |
| | **सीमांतिक कामगार** | **८.६** | **१५.७** |
| | **एकूण कामगार** | **१००** | **१००** |

*(स्रोत:- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०११-१२)*

- वर्ष २००१ मध्ये कृषि व संलग्न कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांची संख्या वर्ष १९९१ च्या तुलनेत ५.२ टक्क्यांनी कमी दिसून येते.
- शेतमजूर व मासेमारीतील कामगारांचे प्रमाण ५.६ टक्क्यांनी कमी झाले.
- वस्तूनिर्माण उद्योगातील कामगारांची संख्या या १० वर्षांच्या कालावधीत १.१ टक्क्यांनी कमी
- खाणकाम व दगडखाणीत काम करणाऱ्या मजूरांच्या संख्येत ०.१ टक्क्यांनी वाढ.
- बांधकाम क्षेत्रातील मजूरांमध्ये १ टक्क्याने वाढ.
- वाहतूक व दळणवळण त्याचप्रमाणे इतर उद्योगधंद्यांमध्ये अनुक्रमे ०.९ टक्के व ३.५ टक्क्यांनी कामगारांच्या संख्येत वाढ.
- **वर्ष १९९१ मध्ये मुख्य कामगार ९१.४ होते त्यात ७.१ ने घट होऊन वर्ष २००१ मध्ये त्यांचे प्रमाण ८४.३ इतके झाले.**
- **सीमांतिक मजूरांच्या संख्येत झालेली वाढ ही तुलनेत सर्वाधिक असल्याचे दिसून येईल. १९९१ ते २००१ या कालावधीत सीमांतिक मजूर हे ७.१ टक्के इतक्या जास्त प्रमाणात वाढले.**

**व्याख्या सूची :-**

**मुख्य कामगार :-** गणनेपूर्वीच्या वर्षामध्ये १८३ दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस काम केलेल्या कामगारांना मुख्य कामगार असे म्हणतात.

**सीमांतिक कामगार :-** गणनेपूर्वीच्या वर्षामध्ये १८३ दिवसांपेक्षा कमी दिवस काम केलेल्या कामगारांना सीमांतिक कामगार असे म्हणतात.

## असंघटीत सेवा क्षेत्रातील उपक्रम व त्यातील कामगार

औद्योगिक क्षेत्रात सेवा क्षेत्र हे महत्त्वाची भूमिका बजावते. असंघटीत सेवा क्षेत्रात कार्यरत असणारे उद्योग आणि कामगार यांचा तपशील खालीलप्रमाणे.

तक्ता क्र. २० (संख्या लाखात)

| राज्य | उपक्रम | कामगार | राज्य | उपक्रम | कामगार |
|---|---|---|---|---|---|
| बिहार | ८.७२ | १३.०९ | **महाराष्ट्र** | **१४.८९** | **३१.६०** |
| छत्तीसगढ | १.७७ | ४.५० | ओडिशा | ६.२२ | १९.२४ |
| गुजरात | ६.४४ | १२.२३ | राजस्थान | ६.०० | ११.८८ |
| कर्नाटक | ८.०५ | १५.९२ | **भारत** | **१६५.१२** | **३२८.८०** |
| मध्यप्रदेश | ४.६८ | १०.१७ | | | |

*(स्रोत:- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००९-१० )*

- महाराष्ट्रात असंघटीत क्षेत्रातील सेवा उपक्रम हे वरील राज्यांच्या तुलनेत सर्वात जास्त १४.८९ लाख इतके असल्याचे दिसून येते.
- असंघटीत क्षेत्रातील सेवा उद्योगांमध्ये गुंतलेल्या कामगारांची संख्या ही वरील राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक ३१.६० लाख इतकी आहे.

## महाराष्ट्रातील बाल कामगार

बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ च्या तरतुदींनुसार, बाल कामगारांना धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास पूर्णत: प्रतिबंध केलेला आहे. बाल कामगार प्रामुख्याने हॉटेल्स, रेस्टॉरंट, लहान दुकाने, सायकल दुरुस्तीची दुकाने, पावर लुम्स, बिडी उद्योग, इ. उद्योगांत आढळून येतात. बाल कामगारांचे पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने कामगार आयुक्तालयाने एप्रिल, २००९ ते मार्च, २०१० पर्यंत ३५,६१९ भेटी दिल्या असता त्यामध्ये २३८ बाल कामगार आढळून आले. तर सदर कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे २९ मालकांविरुध्द न्यायालयात खटले दाखल करण्यात आले. तसेच एप्रिल, २०१० ते जून, २०१० पर्यंत एकूण ७,०५७ भेटी दिल्या असता १७ बाल कामगार आढळून आले तर बाल कामगार कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या ११ मालकांविरुध्द न्यायालयात खटले दाखल करण्यात आले.

*(स्रोत: कार्यक्रम अंदाजपत्रक, २०११-१२, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग- कामगार)*